# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०५/२०१८

**१) संगनमत करुन भांडण करुन डोक्यावर व पाठीवर मारुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २८/०५/२०१८ चे २०.०० ते २१.०० वाजता दरम्यान यातील आठही आरोपीतांनी संगनमत करुन आमचे बाईला सरपंच पदाकरीता का हरवीले या कारणा वरुन यातील फिर्यादी व जखमी सोबत भांडण करुन त्यांना डोक्यावर व पाठीवर काठीने तसेच लाथा बुक्यांनी मारहान करुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी रामचंद्र राखडु झंझाळ वय ४६ वर्ष, रा. वासेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३०७,३२३,१४७,१४८,१४९ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०५/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील अल्पवयीन पिडीत मुलगी फिर्यादी ही शेत शिवारात शेळया चारण्यास गेली असता व शेतातील मोहाचे झाडाखाली बसली असता यातील आरोपीने तिला तुझा नि माझा जमते का? असे लैगिंक गोष्टीची मागणी करुन तिचा उजवा हात पकडुन ओढुन तिचा विनयभंग केला व तसेच अल्पवयीन पिडीत मुलगी व आरोपी हे भिन्न जातीचे असुन अल्पवयीन मुलीचे महिला दक्षता समिती सदस्य यांचे समक्ष फिर्यादी अल्पवयीन पिडीत मुलीचे तक्रारी वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३५४(अ)(ई)(२) भादवी. सहकलम ३(१)(डब्लु)(आय)(२)(व्ही.ए) अजाजअप्रका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) स्नेहल ज्वेलर्स दुकानातील सोन्या– चांदीचे व बेनटेक्सचे साहित्याची चोरी :–**

दिनांक २८/०५/२०१८ चे २२.०० वाजता ते २९/०५/२०१८ चे ०५.०० वाजता पर्यत यातील फिर्यादी रामचंद्र शंकरराव ढोमणे वय ३८ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठणा हे दिनांक २८/०५/२०१८ ला त्याचे स्नेहल ज्वेलर्स दुकाना नेहमी प्रमाणे दिवसभर धंदा करुन सायंकाळी १९.३० वा बंद करुन घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे समोरील लोखंडी शटर्सचे दोन्ही कुलुप तोडुन शटर्स वाकवुन आत प्रवेश करुन दुकानातील १० तोळे चांदीच्या तोरडया, ४ ग्रॅम सोन्याचे नाकातील बेसर २० नग, ईतर बेनटेक्सचे सामान असा एकुण १९,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. काबंळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) मोबाईल दुकानातील चोरी :–**

दिनांक २८/०५/२०१८ चे २१.०० ते २९/०५/२०१८ चे ०९.०० वाजता पर्यत यातील फिर्यादी पंकज अशोक पुरुषलानी वय २५ वर्ष, रा. हनुमान वार्ड वरठी हरीओम मोबाईल दुकानाचे शटर्सचे ताले कोणीतरी अज्ञात चोराने तोडुन दुकानात प्रवेश करुन दुकानात ठेवलेले १७ जिओ कंपनीचे मोबाईल, लावा कंपनीचे मोबाईल २ नग मॉडेल नंबर झेड ८०, झेड ६०, सॅमसंग कंपनीचे ७ नग मोबाईल मॉडेल नंबर ३१३ चे २ नग व मॉडेल नंबर ३१० चे २ नग व मॉडेल नंबर ११० चे १ नग, मायक्रोमॅक्स कंपनीचे ३ नग मोबाईल मॉडेल नंबर ५७०, चायना कंपनीचे मोबाईल २० नग,मोबाईल ऐसेसरीज, हेडफोन, चार्जर बॅटरी, मेमोरी कार्ड, असा एकुण ६४,९००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. काबंळे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) ट्रॅक्टरच्या बॅटरीची चोरी :—**

दिनांक २८/०५/२०१८ चे ००.३० ते ०६.३० वाजता पर्यत यातील फिर्यादी अनिल रामकृष्ण द्रुगकर वय ५६ वर्ष, रा. नाकाडोंगरी याचे मालकीचे ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ डि ७३७२ हा राहते घराचे अंगणात ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने ट्रॅक्टरला लावलेली लिव्हगार्ड कंपनीची काळया रंगाची बॅटरी किंमती ३,५००/—रु. ची चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**६) ट्रक चालकाने मोटार सायकलला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०५/२०१८ चे ०९.३० वाजता पर्यत यातीली चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादी दुकाना समोर ऊभी असलेली फिर्यादीची मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ३६८७ ला गिरोला येथे धडक मारुन अंदाजे १०,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी सचिन तेजराम उरकुडे वय ४० वर्ष, रा. गिरोला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास. पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) शासकीय कामात कसुर केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २५/०५/२०१८ ते २९/०५/२०१८ चे ०२.०० वाजता दरम्यान यातीली आरोपीने शासकीय कामात कसुर केल्याने फिर्यादीस एसडीओ सा. साकोली आरोपीवर गुन्हा दाखल होण्याबाबत लेखी पत्र प्राप्त झाल्याने पत्राचे अनुषगांने फिर्यादीने आरोपी विरुध्द लेखी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १३४ लोक प्रतीनीधी अधी. १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) शेतातील धुऱ्याला आग लागुन पाईप,खात,बोर मधील समरशिबल वायर व रस्सा जळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे शेताला लागुन असलेले दुलीचंद राऊत यांच्या शेतातील धु—याला असलेल्या कच—याला आग लावुन आग न विझवीता तसेच सोडुन दिले त्याने आग लावुन तसेच सोडुन दिल्यास कोणत्याही व्यक्तीला दुखापत व नुकसान होईल हे माहीती असुन सुध्दा बेदरकारपने वागुन फिर्यादीचे शेतातील गवताच्या झोपडीत ठेवलेले पाईप, खात, बोर मधील समरशिबल वायर व रस्सा जळुन अंदाजे १०,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी निलकंठ गोविंदा कोरे वय २८ वर्ष, रा. खैरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**९) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे २१.४५ वाजता दरम्यान यातील मृतक गजानन विठोबा उरकुडे वय ५० वर्ष, रा. पांझरा याने विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती करुन प्राथमीक उपचार करुन रेफर केल्याने त्यास पुढील उपचाराकामी सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे डॉ. मेमो वरुन मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. खोब्रागडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**१०) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :-**

दिनांक २९/०५/२०१८ चे ०३.२० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. निकीता राहुल नागदेवे य २४ वर्ष, रा. वाकेश्वर पो. स्टे. अडयाळ ह. मु. हषवर्धन भिवाजी गजभिये रा. मुजबी यांचे घरी हिने विषारी औषध प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे डॉ. मेमो व मृतकचे वडील यांचे बयाना वरुन, सरतर्फे फिर्यादी पोना. पुराम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग हे करीत आहेत.

**११) इसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :-**

दिनांक २९/०५/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक रोहीदास कारु तरजुले वय ४८ वर्ष, रा. झेंडा चौक सेंदुरवाफा हा मृत अवस्थेत सेंदुरवाफा नशिने देशी दारु दुकानाचे बाजुला आढळुन आल्याने फिर्यादी नितीन सुखदास तरजुले वय २९ वर्ष, रा. झेंडा चौक सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर हे करीत आहेत.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक २८/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तिन सिटर वाहनाकरीता ०१, ईतर वाहनांवरती – ३८ केसेस करण्यात आले आहे.

30/5/18

(डी.डब्ल्यु मंडलवार)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रतः** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.